॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***
दुसऱ्याला मदत करण्यासाठी श्रीमंतीची नाही, तर चांगल्या मनाची गरज असते.

अहिल्यानगर | शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ११३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

आडवळण

ओठात एक मनात एक
किती दिवस चालायचं?
विकासाचे बाळ नेमके
आता कधी रांगायचे?

सरळ रस्त्याला नकोय
उगाच आडवळण!
एकाच गिरणीत
किती दळायचे दळण?

SPOT NEWS

बद्रीनाथजवळ ६ जणांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर कोसळले

● नवी दिल्ली – उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात बद्रीनाथवरून जोशीमठकडे जाणारे एक हेलिकॉप्टर अचानक कोसळल्याची घटना शुक्रवार दि. ३० ऑक्टोबर रोजी घडली आहे. या हेलिकॉप्टरमधून सहा जण प्रवास करत होते अशी माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. खराब हवामानामुळे हे हेलिकॉप्टर कोसळल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. या घटनेबाबत जिल्हा प्रशासनाने सांगितले की, त्यांना हेलिकॉप्टरचा संपर्क तुटल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, हे हेलिकॉप्टर नक्की कोसळलं आहे का? याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. तसेच हेलिकॉप्टरमध्ये नेमकं कोण होतं आणि ही घटना कशी घडली? याबद्दलची सविस्तर माहिती देखील अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, जोशीमठ पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक मनोहर कन्याल यांच्या माहितीनुसार, दुपारी २:२१ वाजता जोशीमठच्या एसडीएमकडून अशी माहिती मिळाली की जोशीमठ परिसरातील चाई गावाच्या परिसरात एक हेलिकॉप्टर कोसळले. याबाबत पुढील माहिती घेतली जात असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

जागतिक कुस्ती स्पर्धेत मनीषाने पटकावले सुवर्णपदक

● नवी दिल्ली – भारताची कुस्तीपटू मनीषा भानवालाने अस्ताना येथे पार पडलेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली. अंतिम सामन्यात तिने अमेरिकेच्या बलाढ्य अबीगेल नेटला पराभूत करीत हे ऐतिहासिक यश संपादन केले. जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारी ती पहिलीच भारतीय महिला कुस्तीपटू ठरली. या आधी पुरुष गटात भारताच्या सुशीलकुमारने जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून पुरुष गटात ऐतिहासिक कामगिरी केली होती. ५९ किलो वजन गट हा ऑलिम्पिक श्रेणीत येत नसला तरी महिला कुस्तीच्या इतिहासातील ही भारताची सर्वांत मोठी कामगिरी मानली जात आहे. यापूर्वी २०२१ मध्ये अंशू मलिकने ५७ किलो वजन गटात अंतिम फेरी गाठत रौप्यपदक जिंकले होते. याशिवाय भारताची दिग्गज कुस्तीपटू विनेश फोगट आणि अंतिम पंघाल यांनी जागतिक कुस्ती स्पर्धेत प्रत्येकी २ कांस्य पदके पटकावली होती. परंतु मनीषा सुवर्णपदक पटकावणारी पहिली भारतीय कुस्तीपटू ठरली.

राज्याबाहेर चारा पाठविण्यास बंदी

दुष्काळग्रस्त भागांसाठी कृती आराखडा । सुका चारा १२ रुपये, मूरघास प्रतिकिलो ८ रुपये दराने खरेदी करणार

● मुंबई । वीरभूमी–

एल-निनोच्या प्रभावामुळे पावसात मोठी घट होऊन राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. दुष्काळामुळे पशुधनासाठी चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी राज्य सरकारने सर्वंकष कृती आराखडा तयार केला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन, संवर्धन आणि पर्यायी स्रोत विकसित करण्यासाठी किमान ५ टक्के निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये, तर मुरघास प्रतिकिलो कमाल ८ रुपये दराने खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आले असून चाऱ्याचा बिगर पशुखाद्य वापर आणि राज्याबाहेर वाहतूक करण्यावरही निर्बंध घालण्यात येणार आहेत.

राज्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ लागू झालेल्या ३०४ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केला होता. या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालाला २७ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून शासनाने उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. या संपूर्ण आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी मदत व पुनर्वसन, वित्त, नियोजन, कृषी, पशुसंवर्धन, जलसंपदा, मृद व जलसंधारण, वन, महसूल, ग्रामविकास, सहकार आणि ऊर्जा विभागांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. दुष्काळी परिस्थितीत राज्यातील चारा पशुधनासाठीच उपलब्ध राहावा, यासाठी पॅकिंग, जैवइंधन आणि वीजनिर्मितीसारख्या बिगर पशुखाद्य कारणांसाठी चाऱ्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालण्यात येणार आहे. तसेच शेजारील राज्यांत चारा पाठविण्यास कायदेशीर प्रतिबंध घालण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

रबी हंगामासाठी महाबीज व खासगी उत्पादकांकडून चारा बियाणे उपलब्ध केले जाणार असून कमी पाण्यात येणाऱ्या आणि वारंवार कापणी करता येणाऱ्या चारा पिकांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे, कृषी महामंडळ तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विद्यापीठे व महामंडळांच्या प्रक्षेत्रांवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेज, ज्वारी आणि बाजरीची लागवड केली जाणार आहे.

गाळपेरा क्षेत्रातील जमिनी शेतकरी व पशुपालकांना चारा लागवडीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कमी जागेत आणि कमी पाण्यात चारा उपलब्ध होण्यासाठी हायड्रोफोनिक, अझोला आणि बिनकाटेरी निवडुंग लागवडीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. जिल्ह्यातील चारा उपलब्धतेचा विचार करून शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्या आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून चारा बँका स्थापन केल्या जाणार आहेत.

उसाचे वाढे वाया जाऊ नयेत यासाठी मजुरांद्वारे ऊसतोडणी करण्याबाबतही कार्यवाही केली जाणार आहे. तसेच चारा बियाणे, कापणी यंत्रे, मुरघास बॅग, चारा डेपो, पिण्याचे पाणी, छावण्यांतील स्वच्छता आणि सीसीटीव्ही सुविधांसाठी सीएसआर निधीचा वापर केला जाणार आहे.

पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती

■ चारा छावण्यांच्या व्यवस्थापनातही महत्त्वाचे बदल करण्यात येणार आहेत. सध्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद पालकमंत्र्यांकडे देऊन तिचे नामकरण जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन संनियंत्रण व आढावा समिती असे करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती स्थापन केली जाणार आहे, असे सांगण्यात आले.

छावणीवर सीसीटीव्ही, बायोमेट्रिकची नजर

■ चारा छावण्यांच्या पारदर्शक व्यवस्थापनासाठी राज्यस्तरीय ऑनलाइन चारा छावणी मॉनिटरिंग अँड मॅनेजमेंट सिस्टीम विकसित केली जाणार आहे. प्रत्येक छावणीत बायोमेट्रिक किंवा क्यूआर कोडद्वारे उपस्थिती, भारत पशुधन प्रणाली (एनडीएलएम) वरील नोंदणीकृत जनावरांची पडताळणी आणि २४ तास सीसीटीव्ही यंत्रणा बंधनकारक केली जाणार आहे.

भाजप-सेनेत ‘धुसफूस’ सुरूच

● मुंबई । वीरभूमी–

महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमधील अंतर्गत मतभेद आणि वाद थेट चव्हाट्यावर आले आहेत. पुण्यात भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आणि शिवसेना नेते व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यात अत्यंत टोकाचे आणि वैयक्तिक पातळीवर वाक्युद्ध रंगले आहे. पदवीधर मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा गेम केल्याचा आरोप करत नवनाथ बन यांनी धंगेकरांवर माकडछाप अशी बोचरी टीका केली, तर धंगेकरांनी बन यांचा उल्लेख वशिला लावून आलेले पगारी पत्रकार असा करत पलटवार केला आहे. या वादामुळे भाजप-शिवसेना युतीमधील समन्वय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.महाराष्ट्र बातम्या

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्यावर महायुतीविरोधी काम केल्याचे गंभीर आरोप केले. धंगेकर यांनी पदवीधर मतदारसंघात भाजप उमेदवाराला मतदान न करण्याचे आवाहन केले होते आणि भाजपचा पराभव झाल्यावर शाब्बास पदवीधरांनो अशी सोशल मीडिया पोस्ट केली, असा दावा बन यांनी केला. यावरून बन यांनी धंगेकरांचा उल्लेख झारीतले शुक्राचार्य असा केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली. या टीकेला रवींद्र धंगेकर यांनीही अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले. त्यांनी बन यांचे सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत फेटाळून लावले. भाजपने नागपूर आणि पुण्यातील पराभवाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, महायुतीला सूज आली असून आता ऑपरेशनची गरज आहे असा टोला धंगेकरांनी लगावला.

पक्ष फिरलेली माकडछाप व्यक्ती : बन

■ धंगेकरांनी आयुष्यभरात १२ पक्ष बदलले, पण त्यांना स्वतःचे राजकीय करिअर घडवता आले नाही. मित्र म्हणायचे आणि पाठीत खंजीर खुपसून भाजप उमेदवाराचा पराभव करायचा, हा धंगेकरांचा धंदा आहे.

वशिला लावून आलेले प्रवक्ते : धंगेकर

■ नवनाथ बन हे काही काळ पगारी पत्रकार होते, त्यांनी वशिला लावून भाजपचे मुख्य प्रवक्तेपद मिळवले आहे. पुण्यात आणि नागपुरात भाजपचा दारूण पराभव झाला आहे, त्याचे खापर दुसऱ्यांवर फोडू नका असे धंगेकर म्हणाले.

सत्तेसाठी जमलेल्यांची हीच अवस्था होते : पेडणेकर

■ महायुतीमध्ये केवळ सत्तेसाठी आणि स्वार्थासाठी एकत्र आलेले लोक आहेत. त्यामुळे निवडणुकीत पराभव होताच हे एकमेकांचे कपडे टराटरा फाडायला निघाले आहेत. निलेश राणेंनी भाजपच्या मुख्य प्रवक्त्याबद्दल ज्या भाषेचा वापर केला, त्यावरून महायुतीमध्ये एकमेकांबद्दल किती आदर आहे हे स्पष्ट होते. शिंदे गटाला सत्तेची मस्ती आली असून ते भाजपच्याच नेत्यांना आता लायकी दाखवायला निघाले आहेत.

फडणवीस, ठाकरे बंधूंमध्ये गुफ्तगू

● मुंबई । वीरभूमी–

मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस आणि ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे आज एकाच मंचावर आले. ‘महाराष्ट्राच्या हास्यरेषा’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त या नेत्यांची विशेष उपस्थिती लाभली. विविध निवडणुकांनंतर आता प्रथमच हे तीन नेते एकत्र आल्याने ते काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावेळी नेत्यांनी मिश्किल टोलेबाजी करीत कार्यक्रमात रंगत आणली. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस आणि ठाकरे बंधूंमध्ये बंददाराआड गुफ्तगू झाल्याने चर्चेला उधाण आले आहे.

ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी संपादित महाराष्ट्राच्या हास्यरेषा या मराठी व्यंगचित्रकलेचा १०० वर्षांचा प्रवास उलगडणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे तिन्ही दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आले. ग्रंथाली प्रकाशनाच्या वतीने आयोजित हा प्रकाशन सोहळा दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात पार पडला.

या सार्वजनिक कार्यक्रमाच्या औपचारिक सुरुवातीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात बंद दाराआड चर्चा पार पडली. राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही प्रमुख नेत्यांमध्ये बंद दाराआड नेमकी काय चर्चा झाली, याबाबत राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

या तिन्ही नेत्यांच्या बंद दाराआड झालेल्या चर्चेला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील टोरेंट पॉवर प्रकल्पाच्या मुद्यावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नुकतीच राज्य सरकारवर जोरदार टीका केली होती. त्याचसोबत ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर प्रकरणात उद्धव ठाकरे यांची शिवसेना अत्यंत आक्रमक झाली आहे. तसेच विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन जागांवर तर महायुतीने दोन विजय मिळवला. यावरून महायुतीत शिवसेना आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू असतानाच हे गुफ्तगू झाल्याने या चर्चेला विशेष महत्त्व आहे.

या कार्यक्रमात टोलेबाजीने रंगत आणली. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी राज ठाकरे बोलावले तर मुख्यमंत्री येतात, असा उल्लेख केला. त्यावर राज ठाकरे यांनी याच्यापुढे मी बोलवत जाईन आणि ते येत जातील. पण २०२९ पर्यंत मुख्यमंत्र्यांना ठेवा म्हणजे झाले, असा शेलार यांना मिश्किल टोला लगावला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी मी राजकारणात काम करायला तयार आहे. परंतु दोन्ही ठाकरे बंधूंनी मला काम करू द्यावे, असा टोला लगावत कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली.

बंद शिवपांदण व शेतरस्ते खुले करण्यासाठी प्रशासनाची हालचाल

‘मिशन झिरो पेंडन्सी’अंतर्गत तहसीलदारांना तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश । शेतकऱ्यांचे लक्ष प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे

● अहिल्यानगर । वीरभूमी–

जिल्ह्यातील बंद शिवपांदण व शेतरस्ते खुले करण्याच्या मागणीला आता वेग आला आहे. शेतरस्त्यांचे सीमांकन करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. ‘मिशन झिरो पेंडन्सी’अंतर्गत या प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कुळकायदा शाखेमार्फत सर्व तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य शिवपांदण रस्ता चळवळ समितीचे अध्यक्ष शरद भाऊसाहेब पवळे यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले होते. या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेऊन जिल्हास्तरावर बैठक आयोजित करावी आणि ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी त्यांनी केली होती.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिक्रमण आणि अन्य वादांमुळे शिवपांदण व शेतरस्ते बंद आहेत. त्यामुळे शेतीमालाची वाहतूक, मशागत आणि इतर कृषी कामांसाठी शेतकऱ्यांना अडचणी येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सर्व बंद रस्ते खुले करणे,

अधिकृत सीमांकन करून कायमस्वरूपी हद्दखुणा निश्चित करणे आणि वहिवाटीच्या शेतरस्त्यांची रुंदी गाव नकाशावर कायदेशीररीत्या नोंदविणे, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांना बारमाही व सुरक्षित वाहतुकीसाठी सिमेंट कॉंक्रीटचे शेतरस्ते उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करावा, अशीही मागणी समितीने केली होती. मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास २६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांसह ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता.

या इशाऱ्याची दखल घेत उपजिल्हाधिकारी (महसूल), अहिल्यानगर यांनी सर्व तहसीलदारांना पत्र पाठवून संबंधित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, भूमी अभिलेख विभागामार्फत आवश्यक मोजमाप करून घेणे आणि कार्यवाहीचा अहवाल तातडीने सादर करणे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रशासनाच्या या हालचालींमुळे शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात किती रस्ते खुले होतात, किती प्रकरणे निकाली निघतात आणि अतिक्रमणांवर काय कारवाई होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ आदेशापुरती कार्यवाही न राहता मोजणी, हद्द निश्चिती आणि रस्ते खुले करण्याची प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

महामार्गाच्या कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळला

● इंदापूर । वीरभूमी–

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील बिजवडी गावाजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाचे काम सुरू असताना भीषण दुर्घटना घडली. कामादरम्यान अचानक डबराचा मोठा ढिगारा कोसळल्याने सहा मजूर ढिगा-याखाली अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून अडकलेल्या मजुरांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, बिजवडीजवळ राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे बांधकाम सुरू होते. याचवेळी अचानक डबराचा ढिगारा कोसळला आणि कामावर असलेले सहा मजूर त्याखाली अडकले. दुर्घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अंकिता पाटील ठाकरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली आहे. बिजवडीजवळ महामार्गाच्या कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळून काही नागरिक अडकल्याची दुर्दैवी घटना घडल्याचे त्यांनी म्हटले आहे. बिजवडीजवळ महामार्गाच्या कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळून काही नागरिक अडकल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित अधिकारी, सरकारी यंत्रणा व माझ्या कार्यालयातील कर्मचा-यांना तातडीने बचावकार्यात सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून सर्व नागरिकांच्या सुखरूप सुटकेसाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच, सर्व संबंधित अधिकारी, सरकारी यंत्रणा आणि आपल्या कार्यालयातील कर्मचा-यांना तातडीने बचावकार्यात सहकार्य करण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून, अडकलेल्या सर्व नागरिकांची सुखरूप सुटका व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

SPOT NEWS

चीनमधील बुद्धिबळ खेळणारा रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये!

● अहिल्यानगर । वीरभूमी–
शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार, ११ नोव्हेंबरपासून अहिल्यानगरमधील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे होणार आहे. स्पर्धेचे मुख्य आकर्षण चीनमधून आणण्यात येणारा बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट असून, तो प्रत्यक्ष खेळाडूंशी डाव खेळणार आहे. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी स्पर्धेची माहिती दिली. गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगणा आदी राज्यांतील २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग निश्चित केला आहे, असे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले. नगरसह बाहेरील खेळाडूंनाही रोबोटसोबत खेळण्याची संधी मिळणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी स्पष्ट केले. स्पर्धेत साडेचार वर्षांच्या बालकापासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत विविध वयोगटांतील बुद्धिबळपटू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा प्रारंभ ११ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता होईल. एकूण नऊ फेऱ्या खेळविण्यात येणार असून, रविवारी दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण होणार आहे. विविध गटांमध्ये एकूण पाच लाख रुपयांची रोख पारितोषिके, ७० करंडक आणि सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. स्पर्धेत १०० आंतरराष्ट्रीय दर्जाचे लाकडी बुद्धिबळ पट वापरण्यात येणार आहेत. स्पर्धा फिडे आणि अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या नियमांनुसार होईल. प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे काम पाहणार असून, पवन राठी, शार्दुल टापसे, दीपक चव्हाण, शिशिर इंदुरकर, प्रशांत धंगेकर आणि देवेंद्र ढोकळे सहाय्यक पंच असतील. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनने स्पर्धेला प्रायोजकत्व दिले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी यशवंत बापट (९३२६०९२५०१) आणि परूनाथ ढोकळे (९८५०७०४२६८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

आप्पासाहेब शिंदे पॅनल'चा दणदणीत विजय; जगन्नाथ शिंदे यांची अध्यक्षपदी निवड!

● अहिल्यानगर । वीरभूमी –
महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या (चडउऊ-) सन २०२६-२०२९ या कालावधीसाठी शिर्डी येथे नुकतेच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत 'आप्पासाहेब शिंदे पॅनल'ने प्रचंड बहुमत मिळवत दणदणीत विजय संपादन केला. या निवडणुकीत आप्पासाहेब उर्फ जगन्नाथ शिंदे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी सलग दहाव्यांदा निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने प्रमुख पदांवर विजय मिळवत संघटनेवरील आपला प्रभाव पुन्हा अधोरेखित केला. राज्यातील एक लाखांहून अधिक सदस्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनेच्या निवडणुकीत औषध विक्रेत्यांनी अनुभव, विश्वासार्हता आणि संघटनात्मक एकजुटीला पसंती दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले. या निवडणुकीत औषध विक्रेत्यांच्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न, दैनंदिन अडचणी, प्रशासनाशी समन्वय आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याच्या दृष्टीने शिंदे पॅनलला मोठा पाठिंबा मिळाला. नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी रामदास भोसले आणि सुनील भंगाळे यांची निवड झाली आहे. संघटनेच्या महत्त्वाच्या सचिवपदी अनिल नावंदर यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला, तर कोषाध्यक्षपदी वैजनाथ जागुष्टे यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्याचे जनसंपर्क अधिकारी म्हणून अजित पारख यांची निवड करण्यात आली असून, सोलापूर येथील बसवराज मनुरे यांची कायदेशीर सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहसचिवपदी सुनील छाजेड आणि संघटन सचिवपदी पंकज नानवाणी यांनी विजय मिळवला आहे. या निवडींमुळे संघटनेच्या आगामी कामकाजासाठी अनुभवी पदाधिकाऱ्यांची टीम तयार झाली आहे. राज्यातील केमिस्ट आणि ड्रगिस्ट बांधवांच्या दैनंदिन अडचणी, व्यवसायासमोरील बदलती आव्हाने, प्रशासनाशी संबंधित प्रश्न आणि औषध विक्रेत्यांच्या हिताचे संरक्षण या मुद्द्यांना आगामी काळात प्राधान्य देण्याचा निर्धार नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. औषध विक्रेत्यांच्या रास्त मागण्या मार्गी लावण्यासाठी तसेच व्यवसायाला सुरक्षितता आणि नवी दिशा देण्यासाठी संघटना कटिबद्ध राहील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. जगन्नाथ शिंदे यांच्या कार्याची देशपातळीवरही दखल घेतली जात असून, त्यांच्यावर देशपातळीवरील अध्यक्षपदाची जबाबदारीही सोपवण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील औषध विक्रेत्यांच्या संघटनात्मक प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या निवडणुकीतील विजयानंतर राज्यभरातील जिल्हा व तालुकास्तरीय औषध विक्रेता संघटनांचे पदाधिकारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून नवनिर्वाचित अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि त्यांच्या संपूर्ण कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात येत आहे. या आयोजनासाठी जिल्ह्यातील पदाधिकारी, संचालक आणि समिती सदस्यांनी समन्वयाने काम केले.

कबड्डीत महादजी शिंदे विद्यालयाची विभागीय स्तरावर भरारी!

१७ वर्षांखालील मुलांच्या संघाला पुणे विभागाचे उपविजेतेपद । तीन खेळाडूंची राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी निवड

● श्रीगोंदा । वीरभूमी –
पुणे विभागीय शालेय कबड्डी स्पर्धेत महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार खेळाच्या जोरावर पुणे विभागाचे उपविजेतेपद पटकावले. अहिल्यानगर शहर आणि सोलापूर ग्रामीणच्या संघांना पराभूत करत अंतिम फेरी गाठणाऱ्या अहिल्यानगर ग्रामीणच्या संघाने पिंपरी-चिंचवडच्या संघाला अंतिम सामन्यात कडवी झुंज दिली. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, तीन खेळाडूंची राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी निवड झाल्याने क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

महादजी शिंदे विद्यालयाच्या १७ वर्षांखालील संघाने स्पर्धेत सुरुवातीपासूनच आक्रमक चढाया, भक्कम पकडी आणि उत्कृष्ट सांघिक समन्वयाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना आव्हान दिले. अहिल्यानगर शहर आणि सोलापूर ग्रामीण या संघांवर विजय मिळवत संघाने अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम

छाया । विजय उंडे

सामन्यात पिंपरी-चिंचवडच्या संघाविरुद्ध खेळाडूंनी जिद्दीने मुकाबला केला. या कामगिरीच्या बळावर संघाने पुणे विभागाचे उपविजेतेपद मिळवले.

विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघानेही स्पर्धेत कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. चपळाई, जिद्द आणि सांघिक भावनेच्या जोरावर खेळाडूंनी उपस्थितांची दाद मिळवली. दोन्ही वयोगटांतील खेळाडूंनी दाखवलेली गुणवत्ता ही विद्यालयातील क्रीडा संस्कृतीची साक्ष ठरली..

या खेळाडूंना कबड्डी प्रशिक्षक मुकेश जाधव, संघ व्यवस्थापक संदीप बिरंगळ आणि विकास लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा विभागप्रमुख सचिन झगडे, प्रा. संजय डफळ, प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड आणि पर्यवेक्षिका सुनीता काकडे यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ क्रीडा उपसंचालक युवराज नाईक आणि जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे यांच्या हस्ते झाला.

या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य गणेश भोस व कुंडलिक दरेकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, उपविभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नायकवडी, काकासाहेब वाळुंजकर, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार व सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच तालुक्यातील क्रीडा शिक्षकांनी खेळाडू, प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

खेळाडूंची नावे

■ **१४ वर्षांखालील संघ :** वेदांत बच्चे, नामदेव साळवे, अजिंक्य पोकळे, आयान शेख, रोहित लबडे, सौरभ मते, मयूर देवखिळे, तन्मय लगड, श्रेयश गोटे, ऋतुपर्ण शिंदे, अथर्व माने आणि विश्वजीत बरबडे.

■ **१७ वर्षांखालील संघ :** ओब्लेश जगताप, प्रथमेश नलगे, समर्थ महारनवर, रुद्र लोखंडे, करण चौहान, करण साळवे, साई खुरंगे, कार्तिक गुडेकर, साईराज तागड, इंद्रजीत नगरे, अभिषेक नलावडे आणि अभिषेक साळवे.

भिंगार प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी बाबासाहेब ढाकणे

उपाध्यक्षपदी स्वप्निल झोडगे । सचिवपदी प्रसाद शिंदे यांची निवड

बाबासाहेब ढाकणे

स्वप्निल झोडगे

प्रसाद शिंदे

अमोल भिंगारदिवे

वैष्णवी कदम

● अहिल्यानगर । वीरभूमी–
भिंगार येथील स्थानिक पत्रकारांची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत 'भिंगार प्रेस क्लब'ची एकमताने स्थापन करण्यात आली. या बैठकीत अध्यक्ष बाबासाहेब ढाकणे, उपाध्यक्ष स्वप्निल झोडगे, सचिव प्रसाद शिंदे, सहसचिव अमोल भिंगारदिवे, खजिनदार वैष्णवी कदम आदींची एकमताने नवनियुक्त पदाधिकार्यांची निवड करण्यात आली.

अध्यक्षपदासाठी उमेर सय्यद यांनी बाबासाहेब ढाकणे यांचे नाव सुचविले. त्यास अनिकेत यादव यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी मोहसीन कुरेशी यांनी स्वप्निल झोडगे यांचे नाव सूचविले, त्यास गिरीश रासकर यांनी अनुमोदन दिले. सचिवपदासाठी प्रशांत पाटोळे यांनी प्रसाद शिंदे यांचे नाव सुचविले, त्यास स्वप्निल झोडगे यांनी अनुमोदन दिले. सहसचिवपदासाठी बाबासाहेब ढाकणे यांनी अमोल भिंगारदिवे यांचे नाव सुचविले, त्यास अनिकेत यादव यांनी अनुमोदन दिले, तर खजिनदारपदासाठी स्वप्निल झोडगे यांनी वैष्णवी कदम यांचे नाव सूचविले, त्यास गिरीश रासकर यांनी अनुमोदन दिले.

यावेळी बैठकीत भिंगार प्रेस क्लब नवनियुक्त पदाधिकार्यांचा व उपस्थितीत कार्यकारिणी सदस्यांचा शाल, पुष्प देऊन गौरव करण्यात आला.

कुकडीचे ५, घोडचे १० नोव्हेंबरपासून आवर्तन

१२ नोव्हेंबरपर्यंत तलावांवरील कृषिपंपांचा वीजपुरवठा सुरू । चारा पिकांसाठी मका बियाणे देणार

● श्रीगोंदा । वीरभूमी–
दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतीसाठी कुकडीचे ५ नोव्हेंबरपासून, तर घोडचे १० नोव्हेंबरपासून आवर्तन सोडण्यात येणार आहे. तसेच तलावांवरील कृषिपंपांचा खंडित वीजपुरवठा १२ नोव्हेंबरपर्यंत पूर्ववत करण्यात येणार असून, चारा पिकांसाठी शेतकऱ्यांना मका बियाणे उपलब्ध करून देणार असल्याची माहिती आमदार विक्रम पाचपुते यांनी दिली.

छाया । विजय उंडे

पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली श्रीगोंदा येथे तिसरी टंचाई आढावा बैठक झाली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. श्रीगोंदा तालुक्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत पाण्याची परिस्थिती चांगली असली, तरी चाऱ्याचा प्रश्न लक्षात घेऊन २६ ऑक्टोबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तलावांवरील कृषिपंपांचा वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली होती. पालकमंत्र्यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लेखी आदेश अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्याला चारा पुरविण्याची क्षमता श्रीगोंदा तालुक्यात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी चारा पिकांना प्राधान्य द्यावे. तसेच फळबागा जगविण्यासाठी उपलब्ध पाण्याचा योग्य व मर्यादित वापर करावा, असे आवाहन पाचपुते यांनी केले.

या बैठकीला कुकडीचे कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे, तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, जलजीवनचे गणेश भोसले आदी उपस्थित होते.

वाचन संस्कृती रुजवण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा

आमदार मोनिकाताई राजळे यांचे आवाहन । पाथर्डीत १८ केंद्रांवर कुसुमाग्रज वाचनालय उपक्रमाचे उद्घाटन

● पाथर्डी । वीरभूमी–
मोबाईल आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे वाचनाची आवड कमी होत असली, तरी प्रत्यक्ष हातात पुस्तक घेऊन वाचनाचा आनंद वेगळाच असतो. एकाग्रता, ज्ञान आणि बुद्धीच्या विकासासाठी पुस्तकांचे वाचन महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी स्वतः वाचन करून साहित्य आणि संस्कृतीचा समृद्ध ठेवा पुढील पिढीपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आमदार मोनिकाताई राजळे यांनी केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'कुसुमाग्रज वाचन अभियान' प्रकल्पांतर्गत पाथर्डी तालुक्यातील सुमारे १८ केंद्रांवर कुसुमाग्रज वाचनालय उपक्रमाचे उद्घाटन आमदार राजळे यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने करण्यात आले. मुख्य कार्यक्रम शहरातील जिल्हा परिषद केंद्रशाळेत झाला.

यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, नगरसेविका मनीषा उदमले, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शेळके, भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष बबलू खोर्दे, गटशिक्षणाधिकारी सचिन राख, विस्तार अधिकारी शिवाजी कराड, शालेय पोषण आहार अधीक्षक रामनाथ कराड, अनिल भवार, निलेश क्षीरसागर, केंद्रप्रमुख सविता कुटे, देवेंद्र अंबेटकर, मुख्याध्यापिका नंदा तुपे, मुख्याध्यापक राजू गोल्हार यांच्यासह शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.

आ. राजळे पुढे म्हणाल्या की, नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांनी अद्ययावत ज्ञान मिळवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. मोबाईलवरील विविध ॲप्समुळे साहित्य सहज उपलब्ध होत असले, तरी प्रत्यक्ष पुस्तक वाचनाचा आनंद कमी झाला आहे. संत, लेखक आणि कवींनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. हा साहित्यिक ठेवा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम यशस्वी करावा. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद

छाया । अनिल खाटेर

भंडारी यांनी शिक्षणासह पर्यावरण आणि शेती क्षेत्रातही चांगले उपक्रम राबवले आहेत. कुसुमाग्रजांच्या नावाने सुरू झालेला हा प्रकल्प राज्यासाठी पथदर्शी ठरावा. त्यासाठी शिक्षकांनी योगदान देतानाच लोकसहभागही वाढवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी या प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शिक्षकांच्या योगदानातून वाचनालयासाठी सुमारे ४०० पुस्तके उपलब्ध करण्यात आली. गायक व शिक्षक बाबा जायभाय आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुरेल स्वागतगीताने कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेग सर यांनी केले, तर रामनाथ कराड यांनी आभार मानले.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' आत्मचरित्र मराठीत

अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या उपस्थितीत आत्मचरित्राचे प्रकाशन । इंग्रजी आवृत्तीनंतर तीन महिन्यांत मराठी पुस्तक वाचकांच्या भेटीला

● अहिल्यानगर । वीरभूमी–
'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन पुण्यात प्रसिद्ध मराठी अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ऑगस्ट २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी आवृत्तीनंतर अवघ्या तीन महिन्यांच्या आत हे पुस्तक मराठी वाचकांच्या भेटीला आले आहे. पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड येथील दालनात हा प्रकाशन सोहळा पार पडला. याच प्रसंगी दालनाचा २५ वा वर्धापनदिनही साजरा करण्यात आला.

भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सचा १९४ वर्षांचा वारसा पुढे नेताना डॉ. सौरभ गाडगीळ यांनी अनुभवलेले चढ-उतार, घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्रातून उलगडतो. पेंग्विन रँडम हाऊस इंडियातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीला ऑगस्ट महिन्यात वाचकांसमोर आणण्यात आले होते. आता मराठी आवृत्तीच्या माध्यमातून डॉ. गाडगीळ यांचा हा वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवास मराठी वाचकांपर्यंत पोहोचणार आहे.

'चूजिंग गोल्ड' हे केवळ एका यशस्वी व्यावसायिकाची कहाणी नसून, परंपरेची जबाबदारी स्वीकारताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा प्रामाणिक लेखाजोखा आहे. पीएनजी ज्वेलर्सचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर डॉ. गाडगीळ यांना अनेक महत्त्वाच्या निर्णयांना सामोरे जावे लागले. या प्रवासात त्यांना आलेले अनुभव, अपयशातून मिळालेली शिकवण, आजोबा आणि आई यांच्यासोबतचे आयुष्यभर स्मरणात राहिलेले संवाद तसेच त्यांच्या विचारांना आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे अनेक प्रसंग या पुस्तकात मांडण्यात आले आहेत. जवळपास दोन शतकांचा व्यावसायिक वारसा जपत बदलत्या काळानुसार व्यवसायाला नवी दिशा देण्यामागील त्यांची भूमिका आणि विचारही यातून समोर येतात. या प्रसंगी पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, 'चूजिंग गोल्ड'ची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित झाल्यापासून हे पुस्तक मराठीत कधी आणता येईल, याची मला उत्सुकता होती. मराठी ही माझी मातृभाषा आहे. त्यामुळे माझ्या आयुष्यातील अनुभव, निर्णय आणि शिकवण माझ्या स्वतःच्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचत आहे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. हे पुस्तक लिहिताना मला माझ्या आयुष्यातील अनेक प्रसंगांकडे पुन्हा एकदा पाहण्याची संधी मिळाली. काही निर्णय योग्य ठरले, काही चुकले, तर काहींचे महत्त्व अनेक वर्षांनंतर उमगले. या सगळ्या अनुभवांनी मला घडवले आहे. या प्रवासात माझ्या कुटुंबाचे संस्कार, पीएनजी ज्वेलर्सचा समृद्ध वारसा आणि आमच्या ग्राहकांनी दाखवलेला विश्वास यांचा मोठा वाटा आहे. मराठी वाचकांशी या पुस्तकाच्या माध्यमातून अधिक जवळून संवाद साधता येणार आहे, याचे मला विशेष समाधान आहे. माझ्या या प्रवासातील एखादा अनुभव जरी वाचकाला आयुष्यातील कठीण निर्णय अधिक आत्मविश्वासाने घेण्यासाठी उपयोगी पडला, तरी या पुस्तकाचा उद्देश सफल झाला, असे मी मानेन. या प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून

उपस्थित असलेल्या प्रसिद्ध मराठी अभिनेत्री श्रेया बुगडे म्हणाल्या, डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड'च्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशनाचा मान मला मिळाला, याचा खूप आनंद आहे. त्यातच पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड दालनाच्या २५ व्या वर्धापनदिनाचा हा विशेष प्रसंग असल्याने माझ्यासाठी हा दुहेरी आनंदाचा क्षण आहे.

'चूजिंग गोल्ड'च्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन हे डॉ. गाडगीळ यांच्या वैयक्तिक प्रवासातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. व्यवसायाच्या चौकटीपलीकडे जाऊन नेतृत्व, कुटुंब, नातेसंबंध, जबाबदारी आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व या पुस्तकातून मांडण्यात आले आहे. त्यामुळे हे आत्मचरित्र केवळ व्यावसायिक किंवा उद्योजकांपुरते मर्यादित न राहता, आयुष्यात स्वतःचा मार्ग घडवू पाहणाऱ्या प्रत्येक वाचकाला आपलेसे वाटेल.

या प्रकाशन सोहळ्यासोबतच पीएनजी ज्वेलर्सच्या पौड रोड दालनाचा रौप्यमहोत्सवही साजरा करण्यात आला. गेल्या २५ वर्षांत या दालनाने परिसरातील ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण केले असून, पीएनजी ज्वेलर्सच्या दीर्घकालीन वाटचालीतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

प्रा. डॉ. राहुल गायकवाड यांना पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता

● श्रीगोंदा । वीरभूमी –

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. राहुल रामचंद्र गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या या मान्यतेमुळे ग्रामीण भागातील इंग्रजी विषयाच्या संशोधक विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात यांच्यासह प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

कै. डॉ. चांडक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आरोग्य भारतीतर्फे १२ मान्यवरांचा धन्वंतरी पुरस्काराने गौरव

● अहिल्यानगर । वीरभूमी –

आरोग्य भारतीतर्फे कै. डॉ. केदारनाथ चांडक (सोनई) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केडगाव येथील सरस्वती विद्यालयात धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी निःस्वार्थ रुग्णसेवा करणाऱ्या चार डॉक्टरांसह योग, सूर्यनमस्कार व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १२ मान्यवरांचा गौरव करण्यात आला. आरोग्य भारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. सुरेश पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास सुहास हिरेमठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. प्रभाकर पवार, डॉ. श्रीवल्लभ घोरपडे, डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. विजयकुमार वऱ्हाडे, शांतीलाल चंदे आणि रमेश माधवस्वामी यांच्यासह अन्य मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ. किशोर पुरकर यांनी आरोग्य भारतीच्या २४ वर्षांतील आरोग्यविषयक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश पाटणकर यांनी व्यसनांपासून दूर राहणे, नियमित व्यायाम, योग आणि प्राणायाम यांचे महत्त्व सांगितले. प्रदूषणामुळे वाढणारे श्वसनविकार आणि कर्करोगाचा धोका लक्षात घेता आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी केले. सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून, हवेच्या प्रदूषणामुळे श्वसनविकारांचाही धोका वाढत आहे. हे धोके कमी करण्यासाठी नियमित व्यायाम, प्राणायाम आणि योगाभ्यासाला दैनंदिन जीवनात महत्त्व दिले पाहिजे. प्रमुख पाहुणे सुहास हिरेमठ यांनी मन प्रसन्न ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. धन्वंतरी ही आरोग्याची देवता मानली जाते. शरीर, बुद्धी आणि मन या तिन्ही स्तरांवर निरोगी राहणे आवश्यक आहे. स्वतःचे आरोग्य जपणे हे प्रत्येकाचे पहिले कर्तव्य आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकजण व्यसनांच्या आहारी जात आहेत. त्यामुळे जीवनशैलीत सकारात्मक बदल करून आरोग्यदायी सवयी अंगीकारणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी आरोग्य भारतीतर्फे स्व. भानुदास कोतकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी डॉ. जयदीप देशमुख, बी.एड. कॉलेजचे प्राचार्य देसाई सर, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, संस्थेचे कार्यवाह दादाराम ढवान, रवींद्र चोभे, डॉ. अजित फुंदे, श्रीपाद शिंदीकर, राजेश परदेशी, कैलास चोथे, योगेश सेतवाल, डॉ. मैत्रेयी लिमये, डॉ. पौर्णिमा पुरकर, डॉ.मधुकर भोर वैशाली चोथे, अयोध्या चांडक आणि प्रणव चांडक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेणुका जोशी यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक, नागरिक उपस्थित होते.

कल्पना राजेंद्र देसरडा यांचे निधन

● पाथर्डी । वीरभूमी –

शहरातील सुश्राविका सौ. कल्पना राजेंद्र देसरडा (वय ५४ वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने देसरडा व भंडारी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून शहरातील व्यापारी व सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे. सौ. कल्पना देसरडा या शहरातील ज्येष्ठ कापड व्यापारी स्व. घेवरचंदजी भंडारी यांच्या ज्येष्ठ कन्या, तर शहरातील किराणा व्यापारी श्री. राजेंद्र देसरडा यांच्या पत्नी होत. माहेर आणि सासरच्या परिवाराशी जिव्हाळ्याचे संबंध जपत त्यांनी सर्वांशी आपुलकीचे नाते निर्माण केले होते. सौ. कल्पना देसरडा या अतिशय मनमिळाऊ, उत्साही, प्रेमळ आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. आपल्या शांत, सुस्वभावी व्यक्तिमत्त्वामुळे तसेच सर्वांशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले विशेष स्थान निर्माण केले होते. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना नातेवाइकांशी आणि परिचितांशी जिव्हाळ्याचे संबंध जपणे, ही त्यांची खासियत होती. त्यांच्या अकाली निधनाने परिवारातील सदस्यांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई, एक नात तसेच भाऊ-बहीण असा मोठा परिवार आहे. सौ. कल्पना देसरडा यांच्या निधनाची बातमी समजताच शहरातील व्यापारी वर्गासह विविध क्षेत्रांतील नागरिकांनी दुःख व्यक्त केले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

पारनेरमध्ये मनसेची ‘पुलाव’ गांधीगिरी!

अपघात रोखण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांचे साखर कारखान्यांना निर्देश । नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

● पारनेर । वीरभूमी–

पारनेर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून गोरगरीब लाभार्थ्यांना निकृष्ट, सडलेले आणि अळ्या पडलेले तांदूळ वितरित होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी केला. या प्रकरणी तहसील प्रशासन आणि पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी केली.

निकृष्ट रेशन धान्याच्या निषेधार्थ पवार यांनी तहसीलदारांच्या अंगावर तांदूळ टाकण्याचे आंदोलन जाहीर केले होते. मात्र, तहसीलदार महिला अधिकारी असल्याने त्यांचा अनादर होऊ नये, या भावनेतून आणि पोलिसांच्या विनंतीनंतर त्यांनी आंदोलनाची पद्धत बदलली. त्याऐवजी गांधीगिरीच्या मार्गाने तहसीलदारांना तांदळाचा पुलाव खाऊ घालून निषेध नोंदवला.

आंदोलनादरम्यान आमदार काशिनाथ दाते (सर) कामानिमित्त तहसील कार्यालयात आले असता, पवार यांनी त्यांनाही संबंधित तांदूळ दाखवला. तांदळात अळ्या असल्याचा दावा करत, असे धान्य गोरगरीब जनतेने कसे खायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मात्र, आमदारांनी आंदोलनकर्त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने आंदोलकांनी आश्चर्य व्यक्त केले. यावेळी तहसीलदारांना चांगल्या दर्जाच्या तांदळापासून तयार केलेला पुलाव देण्यात आला. तहसीलदारांनीही तो स्वीकारला.

छाया । भगवान गायकवाड

आमचा कोणत्याही अधिकाऱ्याविषयी वैयक्तिक रोष नाही. अधिकारी पदावर असल्यामुळे जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांच्याकडे दाद मागितली जाते. महिला अधिकाऱ्यांचा आम्ही शंभर टक्के सन्मान करतो; मात्र त्यांनीही आपल्या पदाची जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे पवार म्हणाले.

रेशन धान्याबाबत तक्रारी येत नसल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात असले, तरी गरीब लाभार्थी तक्रार करण्यासाठी पुढे येत नसण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. काही दुकानदारांकडून दोन दिवसांत धान्य न नेल्यास ते पुन्हा मिळणार नाही, असे सांगितले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तहसीलदारांनी रेशन दुकानांतील निकृष्ट तांदूळ गोळा करून लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी पवार यांनी केली. अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे हा आपला हेतू नसून जनतेला न्याय मिळणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तहसीलदारांनी जबाबदारी स्वीकारून काम करावे; अन्यथा स्वखुशीने बदली करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या आंदोलनावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

या आंदोलनावेळी अविनाश पवार, सतीश म्हस्के, बाळासाहेब शेटे, बाळासाहेब कांबळे, अक्षय सूर्यवंशी, बाबू भैय्या, सूरज गोरे, विशाल गवळी, सागर चव्हाण, मोहित आदी उपस्थित होते.

गहिले वस्तीच्या पाणीप्रश्नावर महिलांचा हंडा मोर्चा

दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे प्रांताधिकाऱ्यांचे आश्वासन

● शेवगाव । वीरभूमी–

शेवगाव शहरातील गहिले वस्ती येथील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला असून, संतप्त महिलांनी हंडे घेऊन तहसील कार्यालयावर हंडा मोर्चा काढत प्रशासनाचे लक्ष वेधले. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची होणारी वणवण थांबवून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी महिलांनी केली. प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी मोबाईलवरून संभाषण करत येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याचे आश्वासन दिल्यानंतर महिलांनी आंदोलन मागे घेतले. मात्र, पाण्याचे नियोजन न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा महिलांनी दिला.

छाया । अमोल कराळे

यंदा पावसाने हुलकावणी दिल्याने गहिले वस्तीवरील विहिरी आणि कूपनलिकांमध्ये पाणी शिल्लक राहिलेले नाही. शेवगाव शहरापासून पूर्वेकडे सुमारे तीन किलोमीटर अंतरावर माळेगाव रस्त्यावर सुमारे ५५० लोकसंख्या असलेली ही वस्ती आहे. नगरपरिषदेच्या वतीने येथे पिण्याच्या पाण्याची कोणतीही कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

आखेगावरस्त्यावरीलपाण्याच्या टाकीपासून गहिले वस्तीपर्यंत पाइपलाइन टाकण्यात आली होती. मात्र, सध्या सुरू असलेल्या कामामुळे ही पाइपलाइन काढण्यात आल्याने वस्तीवर पाणीपुरवठा होत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागत आहे. पावसाळ्यातही अपेक्षित पाऊस न झाल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. माणसांबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे प्रशासन तसेच राजकीय प्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी संतप्त महिलांनी हंडे घेऊन तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी सुनिता शेलार, मंदा शेलार, संगिता शेलार, सुनिता नरवडे, मुक्ता आहेर, मिरा लबडे, छाया लबडे, मिरा काकडे, कविता शेलार, वंदना शेलार, गयाबाई काळे, रेणुका बाबर, मंगल वाघ, अश्विनी लांडे यांच्यासह इतर महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी शिवसेनेचे नेते अरुण मुंढे यांनी गहिले वस्तीवर स्वतंत्र पाइपलाइन टाकण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. त्यांनी प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्याशी मोबाईलवरून संभाषण करून दिले. मते यांनी प्रस्ताव पाठविलेला असल्यास त्याची तातडीने पूर्तता करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी नायब तहसीलदार श्रीनिवास आव्हाड, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, नवनाथ कवडे, प्रीतम गर्जे यांच्यासह गहिले वस्तीवरील नागरिक उपस्थित होते.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शिक्षण समूहाच्या प्राथमिक विद्यामंदिर निर्मलनगरला राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

● शेवगाव । वीरभूमी–

कर्मयोगी आबासाहेब काकडे शिक्षण समूहातील प्राथमिक विद्यामंदिर निर्मलनगर, शेवगाव या शाळेला जय भगवान युवा प्रतिष्ठानचा ‘राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार’ नुकताच प्रदान करण्यात आला. भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

परमपूज्य श्रद्धेय न्यायाचार्य डॉ. नामदेवशास्त्री बाबा, ह. भ. प. सुदर्शन महाराज शास्त्री, ह. भ. प. महंत केशव महाराज शास्त्री आणि ह. भ. प. रामदास महाराज शास्त्री यांच्या आशीर्वादाने झालेल्या कार्यक्रमास शांतीवन संस्थापक दीपक काका नागरगोजे (बीड), स्नेहवन संस्थापक अशोक देशमाने (पुणे), समाजसेवक दीपक दादा पाटील, शिक्षण क्षेत्रातील ज्ञानप्रणेते व मार्गदर्शक सिद्धेश दादा लोकरे, महाराष्ट्राचे आदर्श शिक्षक लहू बोराटे सर तसेच जय भगवान युवा प्रतिष्ठानचे संस्थापक आजिनाथ दहिफळे आणि प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.

सन २००० पासून प्राथमिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्राथमिक विद्यामंदिर निर्मलनगर शाळेने शेवगाव परिसरात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून शाळेत सातत्याने विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रम राबविले जातात.

शाळेतील पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, तसेच शालेय व सहशालेय उपक्रमांमधील वैविध्य आणि वेगळेपणाची दखल घेत शाळेची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. शाळेची शैक्षणिक प्रगतीही सातत्याने सुरू आहे.

हा पुरस्कार शाळेतील आजी-माजी पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक सेवा व योगदानाचे फलित आहे, असे मुख्याध्यापिका परवीन पटेल यांनी सांगितले.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधरजी काकडे, मार्गदर्शक हर्षदाताई काकडे, पृथ्वीसिंग काकडे, बळवंत शिंदे गुरुजी, डॉ. प्रा. लक्ष्मणराव बिटाळ, प्रा. सौ. वंदनाताई पुजारी, अशोक आहेर तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि परिसरातील पालकांनी शाळेचे अभिनंदन केले.

श्रीगोंदा तालुक्यात ग्रामपंचायत अधिकाऱ्याला १ लाख २५ हजारांची लाच घेताना पकडले

लाचलुचपत प्रतिबंधक पथकाची कारवाई

● श्रीगोंदा । वीरभूमी–

ग्रामपंचायतीच्या दप्तरी जागेच्या खरेदी दस्ताची व संमतीपत्राची नोंद करण्यासाठी तक्रारदाराकडे १ लाख २५ हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याप्रकरणी काष्टी व कोळगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी शरद साहेबराव कवडे (वय ५३) यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या वडिलांनी काष्टी येथील सिटी सर्व्हे क्रमांक १८१ मधील ४०.३५ चौ.मी. बांधकाम व बखळ जागा खरेदी केली होती. तसेच काष्टी ग्रामपंचायतीच्या मालकीची १४४ चौ.फूट जागा भाडेतत्त्वावर वापरण्यास दिली होती. या जागेची ग्रामपंचायत नमुना क्रमांक ११ मध्ये नोंद करण्यासाठी आवश्यक असलेल्या खरेदी दस्ताची व संमतीपत्राची नोंद ग्रामपंचायत दप्तरी करण्याच्या मोबदल्यात ग्रामपंचायत अधिकारी कवडे यांनी तक्रारदाराकडे १ लाख २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार करण्यात आली होती.



१४ ऑक्टोबर २०२६ रोजी कोळगाव येथील हॉटेल स्वाद येथे लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. यावेळी कवडे यांनी पंचांसमक्ष १ लाख २५ हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे एसीबीच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात ३० ऑक्टोबर २०२६ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक प्रदीप मेराळे व कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.

लाचखोरीला वरिष्ठांचे अभय आहे का? गलेलठ्ठ पगार असूनही लाचेचा मोह सुटेना

■ श्रीगोंदा तालुक्यात महसूल, पोलीस तसेच विविध शासकीय विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर यापूर्वीही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाया केल्या आहेत. पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या पथकाने केलेल्या सातत्यपूर्ण कारवायांमुळे लाचखोरांचे धाबे दणाणले असले, तरी लाचखोरीला आळा बसताना दिसत नाही. लोकसेवक म्हणून गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही लाचेचा मोह आवरत नसल्याचे वारंवार समोर येत आहे. विशेष म्हणजे, कनिष्ठ स्तरावरील कर्मचारी लाचखोरीत अडकत असताना संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी नेमकी काय भूमिका बजावतात? आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांवर त्यांचे नियंत्रण आहे का? की या भ्रष्टाचाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते? काही ठिकाणी वरिष्ठांच्या आशीर्वादाने हप्त्यांची व्यवस्था चालते का, असा संशयही नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या चर्चेत कितपत तथ्य आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे. केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई न करता भ्रष्टाचाराच्या मुळापर्यंत तपास पोहोचणार का, हा खरा प्रश्न आहे.

पारनेर-सुपा रस्त्यावरील सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर

लकी हॉटेलजवळील ड्रेनेज चेंबरची पाहणी करण्यासाठी अभियंता पाठवण्याची नागरिकांची मागणी

● पारनेर । वीरभूमी–

पारनेर-सुपा रस्त्यावरील लकी हॉटेलजवळील ड्रेनेज चेंबरमधून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक नियोजन नसल्याने नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. पारनेर नगरपंचायत प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन अभियंता पाठवावा आणि प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी सजग नागरिकांकडून होत आहे.

पारनेर-सुपा रस्त्यावरील लकी हॉटेलजवळील ड्रेनेज चेंबरमधून सांडपाणी वाहत आहे. या पाण्याची पुढील व्यवस्था कशी करायची, त्याची विल्हेवाट कोणत्या पद्धतीने लावायची आणि पाण्याचा प्रवाह योग्य दिशेने कसा वळवायचा, याबाबत स्पष्ट नियोजन आवश्यक आहे. मात्र, सध्या या ठिकाणी सांडपाण्याच्या व्यवस्थापनाचा प्रश्न कायम असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, या परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणाऱ्या गटाराचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे गटाराचे काम पूर्ण झाल्यानंतर ड्रेनेज चेंबरमधून वाहणाऱ्या सांडपाण्याचे नियोजन नेमके कसे करण्यात येणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गटाराचे काम पूर्ण झाले असले, तरी सांडपाण्याचा योग्य निचरा आणि त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था स्पष्ट होणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात परिसरातील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

संभाजीनगरमधील सांडपाण्याचा प्रश्न सोडवा!

■ नगरपंचायत प्रशासनाने संभाजीनगरमधील घरगुती सांडपाण्याची योग्य व्यवस्था केली नाही, तर भविष्यात आमच्या घरात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा.

– राजूभाई शेख, नागरिक

संबंधित विभागाच्या अभियंत्याने घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी. तसेच ड्रेनेज चेंबरमधून वाहणाऱ्या सांडपाण्याचा प्रवाह, उपलब्ध गटार व्यवस्था आणि पाण्याच्या विल्हेवाटीचे नियोजन यांची तपासणी करून योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

छाया । भगवान गायकवाड

पारनेर-सुपा रस्त्यावरील या समस्येवर तातडीने उपाययोजना करून सांडपाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नगरपंचायत प्रशासन या मागणीची दखल घेऊन अभियंता पाठवते का आणि हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोणती कार्यवाही करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शेवगाव शहरात ऊस वाहतुकीचा धोका वाढला

आंबेडकर चौकात ओव्हरलोड ट्रेलर उलटल्याने ऊस रस्त्यावर । अवजड वाहतुकीवर नियंत्रणाची नागरिकांची मागणी

● शेवगाव । वीरभूमी–

साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाल्याने ऊस वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील रखडलेल्या रस्त्यांमुळे अवजड वाहतूक धोकादायक ठरत असून, बुधवारी रात्री आंबेडकर चौकाजवळील चढावर पैठणकडून नगरकडे जाणारे ऊसाचे ओव्हरलोड ट्रेलर उलटले. या घटनेत रस्त्यावर ऊस पडल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले. ही घटना दिवसा घडली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली.

■ छाया । अमोल कराळे

तालुक्यात यंदा पाऊस न झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेवगाव तालुक्याची ऊसाचे आगार म्हणून ओळख असली तरी पाण्याअभावी यंदा उसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. जायकवाडी धरण परिसरात तुलनेने ऊसाचे क्षेत्र असल्याने साखर कारखान्यांचा हंगाम सुरू होताच शेवगावसह नेवासा, पाथर्डी, राहुरी, नगर, संगमनेर, राहाता तसेच शेजारील जिल्ह्यांतील कारखान्यांकडून ऊस मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली आहे.

ऊस वाहतुकीसाठी क्षमतेपेक्षा अधिक ऊस भरलेले ट्रक, ट्रॅक्टर-ट्रेलर आणि अन्य अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरातील वळणांवर तसेच चढाच्या रस्त्यांवर ही वाहने येताच ट्रेलर उलटण्याचे किंवा मागे सरकून अपघात होण्याचे प्रकार वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

बुधवारी रात्री पैठणकडून नगरकडे जाणारे ऊसाचे ट्रेलर आंबेडकर चौकातील चढावर ओव्हरलोडमुळे रस्त्याच्या मधोमध उलटले. यामुळे मोठ्या प्रमाणात ऊस रस्त्यावर पडला. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्याच्या उसाचे नुकसान झाल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली. दिवसा ही घटना घडली असती तर वाहनांची वर्दळ असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

नगर-तिसगाव रस्त्याचे काम सुरू असून, शहरात आल्यानंतर काही कारणांमुळे हे काम बंद आहे. त्यामुळे मराठवाड्याकडून मोठ्या शहरांकडे जाणारी वाहने आणि ऊस वाहतूक करणारी अवजड वाहने शहरातूनच मार्गस्थ होत आहेत.

परिणामी शहरात वारंवार वाहतूक कोंडी होऊन अपघाताचा धोका वाढत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

अवजड ऊस वाहतूक दिवसा बंद ठेवून ती रात्रीच्या वेळी सुरू ठेवावी, तसेच शहरातील रखडलेले रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आरटीओ आणि पोलिस प्रशासनाने छोटी-मोठी वाहने तपासण्याबरोबरच ओव्हरलोड ऊस वाहतुकीवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.

दैठणेगुंजाळ सेवा सहकारी सोसायटीत २४.४६ लाखांचा अपहार?

तत्कालीन सचिव, संगणक प्रणाली पुरवठादार व लेखापरीक्षकांविरुद्ध पोलिसांत फिर्याद

● पारनेर । वीरभूमी –

पारनेर तालुक्यातील दैठणेगुंजाळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या आर्थिक व्यवहारांत २४ लाख ४६ हजार ५५१ रुपयांचा कथित अपहार झाल्याचे चाचणी लेखापरीक्षणात समोर आले आहे. या प्रकरणी संस्थेचे तत्कालीन सचिव, संगणक प्रणाली पुरविणारी कंपनी व तिचे प्रोप्रायटर तसेच प्रमाणित लेखापरीक्षक यांच्याविरोधात शासकीय लेखापरीक्षक मुकेश मारुती वडीयार यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कर्जवसुलीच्या रकमांमधील तफावत, संगणकीय नोंदींतील फेरफार, डेटा फाइल नष्ट करणे आणि लेखापरीक्षणातील अनियमिततेचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता पोलीस तपासातून स्पष्ट होणार आहे.

दैठणेगुंजाळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था २७ जुलै १९५९ रोजी नोंदणीकृत झाली आहे. सभासदांना शेतीसाठी कर्जपुरवठा करणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार संस्थेच्या चाचणी लेखापरीक्षणासाठी शासकीय लेखापरीक्षक मुकेश वडीयार यांची नियुक्ती करण्यात आली होती. लेखापरीक्षणात आर्थिक व्यवहारांतील तफावत आणि कथित अपहार आढळल्याने ६ नोव्हेंबर रोजी विनिर्दिष्ट अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पारनेर यांनी पडताळणी व सुनावणी करून २१ ऑगस्ट रोजी प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यास परवानगी दिली. त्यानुसार २८ ऑक्टोबर रोजी पोलिसांत फिर्याद देण्यात आली.

संस्थेचे तत्कालीन सचिव सुरेश मलबा रोकडे यांनी २७ ऑक्टोबर २०१६ ते ३१ जानेवारी २०२३ या कालावधीत काम पाहिले. सभासदांकडून कर्जाच्या परतफेडीपोटी जमा होणाऱ्या रकमांच्या नोंदी ठेवणे, अधिकृत पावत्या देणे आणि आर्थिक व्यवहारांचा हिशोब अद्ययावत ठेवणे ही त्यांची जबाबदारी होती. मात्र, काही सभासदांकडून वसूल केलेल्या रकमांच्या पावत्या न देणे, जमा रकमा संस्थेच्या दप्तरी न नोंदवणे आणि काही रकमा अनामत दाखवून त्यांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप फिर्यादीत आहे. त्यामुळे रोख नोंदी, ताळेबंद आणि कर्जदारांच्या याद्यांमध्ये तफावत निर्माण झाली. ही तफावत लपविण्यासाठी संगणकीय प्रणालीत ८ लाख ६५ हजार ३७० रुपये १५ पैशांच्या अनधिकृत हस्तांतरण नोंदी केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. खोटे हिशोब तयार करणे, आर्थिक नोंदींमध्ये फेरफार करणे आणि काही डेटा फाइल नष्ट केल्याचाही उल्लेख फिर्यादीत आहे. या सर्व प्रकारांतून २४ लाख ४६ हजार ५५१ रुपयांचा कथित अपहार झाल्याचे लेखापरीक्षणात नमूद करण्यात आले आहे. संस्थेच्या संगणक प्रणालीमध्ये जुन्या तारखांच्या नोंदी करणे, आधीच्या नोंदी पुसणे आणि ताळेबंदातील आकडे बदलण्याची सुविधा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दैनंदिन व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या 'डे एन्ड' आणि 'इयर एन्ड' प्रक्रियांमध्येही त्रुटी असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

वार्षिक देखभाल करार असूनही प्रणालीतील त्रुटी दूर करण्यात आल्या नाहीत असा आरोप आहे. प्रमाणित लेखापरीक्षक सुभाष दिवटे यांनी पहिल्या दोन आर्थिक वर्षांसाठी सर्वसाधारण सभेची अधिकृत नियुक्ती नसतानाही काम केल्याचा आरोप आहे. तसेच २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती रद्द झाल्यानंतरही संस्थेच्या दप्तराचा ताबा घेऊन लेखापरीक्षण केल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे मूळ अभिलेख, संगणकीय डेटा, कर्जफेडीच्या पावत्या, बँक व्यवहार आणि विविध आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तपासून आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी तत्कालीन सचिव सुरेश रोकडे, परफेक्ट कॉम्प्युटर सिस्टीमचे प्रोप्रायटर आणि प्रमाणित लेखापरीक्षक सुभाष दिवटे यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी शासकीय लेखापरीक्षक मुकेश वडीयार यांनी केली आहे.

जुनी पेन्शनच्या मागणीसाठी पाथर्डीत एल्गार; ३१ ऑक्टोबर 'काळा दिवस' म्हणून पाळणार

● पाथर्डी । वीरभूमी–

राज्यातील राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, अहिल्यानगर जिल्हा व पाथर्डी शाखेच्या वतीने आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. ३१ ऑक्टोबर हा दिवस NPS धारक कर्मचाऱ्यांसाठी अन्यायकारक निर्णयाची आठवण करून देणारा असल्याने तो 'काळा दिवस' म्हणून पाळण्यात येणार आहे. यासंदर्भात पाथर्डी तहसीलदार यांना निवेदन देऊन शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

■ छाया । अनिल खाटेर

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २००५ रोजी अधिसूचना काढून १ नोव्हेंबर २००५ पासून सेवेत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना बंद करून नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केली. या निर्णयामुळे त्यानंतर सेवेत दाखल झालेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी व विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वर्षे प्रामाणिकपणे शासकीय सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सन्मानाने व सुरक्षितपणे जीवन जगता यावे, यासाठी जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने निवेदनातून मांडली आहे.

या निर्णयाला २१ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व विभागांतील छझड धारक कर्मचारी काळ्या फिती लावून नियमित कामकाज करीत निषेध नोंदविणार आहेत. या आंदोलनाच्या माध्यमातून जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी पुन्हा एकदा तीव्रतेने शासनदरबारी मांडण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या भविष्याची आर्थिक व सामाजिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी देवेंद्र आंबेटकर, अमोल भंडारी, नितीन जाधव, महेश वाघमोडे, रवींद्र फुंदे, संदीप भागवत, जतिन चव्हाण, कृष्णा रेपाळ, अनिल शेळके, अश्रुबा चव्हाण, अनिल शिंदे, अरविंद चव्हाण यांच्यासह जुनी पेन्शन हक्क संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

'एकच मिशन, जुनी पेन्शन' या निर्धाराने कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

फिर्यादीच निघाला लुटमारीचा सूत्रधार! पारनेर पोलिसांची १२ तासांत कारवाई

१३.६१ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांना अटक

● पारनेर । वीरभूमी–

पिकअप वाहन अडवून कोयत्याचा धाक दाखवत ३ लाख ४१ हजार रुपयांची रोकड आणि मोबाईल लुटल्याचा बनाव करून पोलिसांची दिशाभूल केल्याचा प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणात खुद्द फिर्यादीच लुटमारीचा सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले. पारनेर पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या १२ तासांत तिघांना अटक करून १३ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

■ छाया । भगवान गायकवाड

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे चारच्या सुमारास मांडवे (ता. पारनेर) येथील घाटातून फिर्यादी पिकअप वाहनाने जात होते. त्यावेळी तीन अज्ञात व्यक्तींनी इनोव्हा कार आडवी लावून कोयत्याचा धाक दाखवला आणि कोंबड्या विक्रीतून मिळालेले ३ लाख ४१ हजार रुपये तसेच फिर्यादी व साक्षीदाराचा मोबाईल हिसकावून नेल्याची तक्रार देण्यात आली होती. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६), १२६(३)(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी गुप्त पथकाला तपासासाठी रवाना केले. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरिफ जाबीर खान (वय ३०, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि शोएब चांद शेख (वय २९, रा. फकीरवाडा, अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच फिर्यादी मजहर खुदाबक्ष शेख (वय ३२, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांच्या सांगण्यावरून हा प्रकार केल्याचे समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

या कारवाईत १० लाख रुपये किमतीची इंडिगा कार, ३ लाख ४१ हजार रुपयांची रोख रक्कम आणि २० हजार रुपये किमतीचा ओप्पो मोबाईल असा एकूण १३ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, अपर उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास सहायक पोलीस अधिकारी पोपट रोकडे करीत आहेत.

पोल उभारण्यासाठी शेतकऱ्यांना मागितली लाच; महावितरणचा वरिष्ठ तंत्रज्ञ एसीबीच्या ताब्यात

● शेवगाव । वीरभूमी–

नांदुर विहिरे परिसरातील पडलेला वीजपोल नव्याने उभारण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैसे गोळा करण्याच्या नावाखाली एक हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे. बापुसाहेब ठकाजी वीरकर (वय ४०), वरिष्ठ तंत्रज्ञ, ढोरजळगाव सेक्शन, महावितरण, शेवगाव, रा. वाघोली, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर, असे ताब्यात घेतलेल्या लोकसेवकाचे नाव आहे.

तक्रारदारांची नांदुर विहिरे गावातील गट नं. २२२/१ मध्ये शेती असून विहिरीतील पाणी कृषीपंपाद्वारे शेतीसाठी वापरले जाते. या कृषीपंपासाठी महावितरणचे अधिकृत वीज कनेक्शन आहे. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी तक्रारदारांनी शेतीपंपाची वीज बंद असल्याची माहिती वायरमन वीरकर यांना फोनवरून दिली.

यावेळी परिसरातील वीजपोल पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला असून नवीन पोल उभारावा लागणार असल्याचे वीरकर यांनी सांगितले. त्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी मिळून ६ हजार रुपये वर्गणी जमा करून देण्यास सांगितले. त्यात तक्रारदारांकडून एक हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आल्याची तक्रार ८ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगरकडे प्राप्त झाली.

तक्रारीच्या अनुषंगाने ८ ऑक्टोबर रोजी एसीबीच्या पथकाने पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी केली. यावेळी वीरकर यांनी नांदुर विहिरे परिसरातील वीजपोल नैसर्गिकरीत्या पडल्याचे सांगून नवीन पोल बसविण्यासाठी सहा जणांकडून मिळून ६ हजार रुपये, म्हणजेच प्रत्येकी एक हजार रुपये, देण्याची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी वीरकर यांना २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक छाया देवरे, पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, पोकॉ. गजानन गायकवाड, पोकॉ. सचिन सुदुक, पोकॉ. वैभव सुपेकर व चालक पोलीस हवालदार करांडे यांच्या पथकाने केली.

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये

७२ वर्षीय महिलेच्या पोटातून १५ किलो वजनाची अंडाशयाची गाठ यशस्वीरीत्या काढली

अवघ्या तीन तासांत आव्हानात्मक शस्त्रक्रिया । रुग्णाची प्रकृती उत्तम

● अहिल्यानगर । वीरभूमी–

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आलेली ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असून तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली आहे.

सदर महिला रुग्णाच्या पोटामध्ये मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. या गाठीमुळे पोटावर मोठा ताण निर्माण होऊन रुग्णाला श्वास घेण्यास, लघवी करण्यास तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्यामुळे रुग्णाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत होता. तपासणीनंतर ही अंडाशयाची गाठ असल्याचे निदर्शनास आले. गाठीचा प्रचंड आकार आणि तिची इतर अवयवांशी झालेली चिकटण ही शस्त्रक्रियेतील प्रमुख आव्हाने होती.

या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये डॉ. अद्वैत वैद्य (कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ) आणि डॉ. दीपक गाडेकर (मूत्रविकार तज्ञ) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेदरम्यान गाठ आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने विशेष काळजी आणि कौशल्याची आवश्यकता होती. रुग्णाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉक्टरांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि सुमारे १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली.

वृद्ध वयातील रुग्ण, गाठीचा मोठा आकार आणि इतर अवयवांशी असलेली चिकटण या सर्व बाबी लक्षात घेता ही शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. मात्र, तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य, योग्य उपचारनियोजन आणि रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असल्याने रुग्णालयातील डॉक्टर व उपचार पथकाने समाधान व्यक्त केले.

माननीय नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयात सुपर स्पेशलिटीच्या सोई सुविधा गोरगरिबांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते.

अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडणे हे रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यक्षमता, वैद्यकीय अनुभव आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीचे द्योतक आहे. समाजातील सर्व स्तरांतील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या रुग्णालयाच्या प्रयत्नांना या यशामुळे आणखी बळ मिळाले आहे.